BOMBAY ACT No. XLIX OF 1956.

## AN ACT TO PROVIDE FOR THE SALARIES AND ALLOWANCES OF MEMBERS OF THE BOMBAY LEGISLATURE AND CERTAIN OTHER MATTERS.

See Mah. Act XI of 76

## सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम ४९ वा.

[ राज्यपाल यांची मंजुरी मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख ३० माहे नोव्हेंबर सन १९५६ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला. ]

## मुंबई विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते व कित्येक इतर बाबी यांसाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते व यांत यापुढें दिलेल्या कित्येक इतर बाबी यांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढें लिहिल्याप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

१. (१) या अधिनियमास सन १९५६ चा मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते यांबाबत अधिनियम असें म्हणावें. लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९५६ रोजीं अंमलांत आला आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

२. या अधिनियमांत, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) "विधानसभा" या संज्ञेचा अर्थ, मुंबई विधानसभा असा समजावा;

(ब) "सभापति" या संज्ञेचा अर्थ, विधानपरिषदेचा सभापति असा समजावा;

(क) "समिति" या संज्ञेचा अर्थ, प्रसंगाप्रमाणें, विधानसभेची किंवा विधानपरिषदेची समिति किंवा या दोहोंची संयुक्त समिति असा समजावा;

(ड) "विधानपरिषद" या संज्ञेचा अर्थ, मुंबई विधानपरिषद असा समजावा;

(इ) "सदस्य" या संज्ञेचा अर्थ, प्रसंगाप्रमाणें, विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य असा समजावा;

(फ) "मंत्री" व "उपमंत्री" या संज्ञांचा अर्थ, मुंबई सरकारचा अनुक्रमें मंत्री व उपमंत्री असा समजावा व "मंत्री" या संज्ञेत, मुख्य मंत्र्याचा समावेश होतो;

(ग) "संसद सचिव" या संज्ञेचा अर्थ, मंत्री-संसद-सचिव असा समजावा;

(ह) "अध्यक्ष" या संज्ञेचा अर्थ, विधानसभेचा अध्यक्ष असा समजावा.

३. प्रत्येक सदस्यास दरमहा रु. १५० या दरानें पगार देण्यांत येईल. सदस्यांना द्यावयाचा पगार.

४. (१) प्रत्येक सदस्यास, राज्य सरकार या संबंधांत करील अशा नियमांस किंवा देईल अशा आदेशांस पात्र ठेवून, प्रसंगाप्रमाणें, विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या अधिवेशनास किंवा समितिच्या सभेस हजर राहण्याच्या कारणाकरितां असें अधिवेशन किंवा सभा ज्या ठिकाणीं भरविण्यांत येत असेल त्या ठिकाणीं वास्तव्य केल्याच्या मुदतीपैकीं प्रत्येक दिवसाबद्दल रु. १० या दरानें दैनिक भत्ता देण्यांत येईल: सदस्यांना द्यावयाचा दैनिक भत्ता.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या ठिकाणीं असें अधिवेशन किंवा सभा भरविण्यांत येत असेल त्या ठिकाणीं सामान्यपणें राहणाऱ्या किंवा धंदा चालविणाऱ्या सदस्याच्या बाबतींत, अशा सदस्यास, वर सांगितलेल्या नियमांस किंवा आदेशांस पात्र ठेवून, तो अशा अधिवेशनास किंवा सभेस हजर राहिल्याच्या प्रत्येक दिवसाबद्दल रु. १० या दरानें दैनिक भत्ता देण्यांत येईल.

सदस्यांना द्यावयाचा प्रवासभत्ता.

५. (१) प्रत्येक सदस्यास विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या अधिवेशनास किंवा समितीच्या सभेस हजर राहण्याच्या कारणासाठीं, असें अधिवेशन किंवा सभा ज्या ठिकाणीं भरविण्यांत येत असेल त्या ठिकाणीं जाण्याकरितां व अशा ठिकाणाहून परत जाण्याकरितां केलेल्या प्रवासाबद्दल—

(१) राज्य सरकारनें केलेल्या नियमांवरून किंवा दिलेल्या आदेशांवरून ठरविण्यांत येईल अशा ज्या वर्गाची सोय आगगाडींत किंवा आगबोटींत करण्यांत आली असेल त्या वर्गाच्या भाड्याच्या दीडपट दरानें, आणि

(२) आगगाडीनें किंवा आगबोटीनें केलेल्या प्रवासाशिवाय आणखी रस्त्याच्या समुद्राच्या किंवा नदीच्या मार्गानें केलेल्या प्रवासाबद्दल, दर मैलास राज्य सरकार त्याप्रमाणें ठरवील अशा दरानें,

प्रवासभत्ता देण्यांत येईल :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जर एखादा सदस्य असें अधिवेशन किंवा सभा ज्या ठिकाणीं भरविण्यांत येत असेल त्या ठिकाणीं सामान्यतः रहात असेल किंवा धंदा चालवीत असेल, तर अशा सदस्यास, ह्या पोट-कलमांतील कोणत्याहि मजकुरा-मुळें प्रवासभत्ता मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

(२) पोट-कलम (१) मध्यें कोणताहि मजकूर असला तथापि, प्रत्येक सदस्यास, अशा अधिवेशनास किंवा सभेस ज्या दिवशीं तो हजर राहील त्या प्रत्येक दिवसा-बद्दल दररोज रु. ३ या दरानें वाहनभत्ता देण्यांत येईल.

राहण्याच्या जागेची सोय.

६. राज्य सरकारास, या संबंधांत केलेल्या नियमांवरून किंवा दिलेल्या आदेशां-वरून ठरविण्यांत येतील अशा प्रमाणांत व अशा शर्तींवर, मुंबईंत सदस्यांकरितां राहण्यासाठीं जागेची तरतूद करण्याचा अधिकार आहे.

मंत्री, उपमंत्री, अध्यक्ष, सभापति किंवा पगारी संसदसचिव यांस या अधिनियमा-अन्वयें पगार व भत्ते मिळण्याचा हक्क नसणें.

७. या अधिनियमांत कोणताहि मजकूर असला तथापि, मंत्री, उपमंत्री, अध्यक्ष, सभापति किंवा पगारी संसदसचिव हे विधानसभेचे किंवा विधानपरिषदेचे सदस्य आहेत या कारणावरून मंत्री किंवा उपमंत्री, अध्यक्ष किंवा सभापति किंवा पगारी संसदसचिव यांस ह्या अधिनियमाअन्वयें कोणताहि पगार, भत्ते किंवा राहण्यासाठीं जागा मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

नियम करण्याचा व आदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

८. (१) ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां नियम करण्याचा किंवा आदेश देण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(२) ह्या कलमाअन्वयें केलेला कोणताहि नियम किंवा दिलेला कोणताहि आदेश, १ माहे नोव्हेंबर सन १९५६ या तारखेच्या अगोदरची नाहीं अशा कोणत्याहि तारखेपासून गतकालापेक्षी अंमलांत येईल अशा रीतीनें करण्याचा किंवा देण्याचा अधिकार आहे.

(२) ह्या कलमाअन्वयें केलेले नियम किंवा दिलेले आदेश, जणूं ते ह्या अधिनियमांत करण्यांत किंवा देण्यांत आल्याप्रमाणें अंमलांत येतील.

९. सन १९३७ चा मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते यांबाबत रद्द करणें. अधिनियम, सन १९५० चा मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांच्या दैनिक भत्त्याबाबत अधिनियम व सन १९५० चा मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांच्या प्रवासभत्त्याबाबत अधिनियम (ज्यांस या कलमांत "सदरहू अधिनियम" असें म्हटलें आहे) आणि जे प्रदेश तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९५६ नंतर नवीन मुंबई राज्याचे भाग बनतात त्या प्रदेशांत किंवा त्यांच्या संबंधांत त्या तारखेच्या लगतपूर्वी अंमलांत असलेला, ह्या अधिनियमाच्या ठरावांसारखा कोणताहि कायदा हे रद्द होतील:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा रीतीनें सदरहू अधिनियम व कायदा रद्द करण्यांत आले असले तरीहि, सदरहू अधिनियमांअन्वयें केलेले कोणतेहि नियम किंवा दिलेले कोणतेहि आदेश, जेथवर ते ह्या अधिनियमाच्या ठरावांशीं विसंगत नसतील तेथवर, अंमलांत असण्याचें चालू राहतील व ते ह्या अधिनियमाअन्वयें केलेले कोणतेहि नियम किंवा दिलेले कोणतेहि आदेश यांवरून रद्द करण्यांत आले असतील तो प्रसंग खेरीज करून व रद्द करण्यांत येईपर्यंत ह्या अधिनियमाच्या ठरावांअन्वयें करण्यांत किंवा देण्यांत आले आहेत असें समजलें पाहिजे.

(True translation)

D. T. MUZUMDAR,
Examiner of Books and Publications, Bombay.